विधि व न्याय विभाग

५ वा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३ ऑक्टोबर २०२३.

अधिसूचना

ग्राम न्यायालय अधिनियम, २००८.

क्रमांक न्यायस्था-१०२२/प्र.क्र.१२४/कार्यासन -११.—ज्याअर्थी, ग्राम न्यायालय अधिनियम, २००८ (२००९ चा ४) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ३ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्रमांक सीआरसी २०१३/प्र.क्र.१५/कार्यासन १२, दिनांक २८ फेब्रुवारी २०१४ याद्वारे, रत्नागिरी जिल्ह्यातील मंडणगड येथे, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांस दुय्यम असलेले एक ग्राम न्यायालय दिनांक २ मार्च २०१४ पासून स्थापन केले आहे;

आणि ज्याअर्थी, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २) च्या कलम ११ च्या पोट-कलम (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून, आणि मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना,विधि व न्याय विभाग, क्रमांकःन्यायस्था-१०२२/प्र.क्र.१२४/कार्यासन -११, दिनांक ३ ऑक्टोबर, २०२३ याद्वारे, न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंडणगड यांचे नियमित न्यायालय दिनांक ८ ऑक्टोबर २०२३ पासून स्थापन केले आहे ;

आणि ज्याअर्थी, संबंधित अधिकारीतेकरिता न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मंडणगड यांचे नियमित न्यायालय म्हणून काम करीत असल्याने, मंडणगड गावाकरिता ग्राम न्यायालय म्हणून कामकाज करण्याचे बंद होईल, असा निदेश देणे महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र दिवाणी न्यायालय अधिनियम (१८६९ चा १४) च्या कलम २१, २२अ आणि २३ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून; आणि याबाबतीत यापूर्वी काढण्यात आलेल्या सर्व अधिसूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून, आणि मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचारविनिमय केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाने, शासकीय अधिसूचना, विधि व न्याय विभाग, क्रमांकःन्यायस्था-१०२२/प्र.क्र.१२४/कार्यासन-११. दिनांक ३ ऑक्टोबर २०२३ याद्वारे, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मंडणगड यांचे नियमित न्यायालय दिनांक ८ ऑक्टोबर २०२३ पासून स्थापन केले आहे;

आणि ज्याअर्थी, संबंधित अधिकारितेकरिता दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, मंडणगड यांचे नियमित न्यायालय म्हणून काम करीत असल्यामुळे, मंडणगड गावाकरिता ग्राम न्यायालय म्हणून कामकाज बंद करावे, असे निदेश देणे महाराष्ट्र शासनास इष्ट वाटते ;

त्याअर्थी, आता, ग्राम न्यायलय अधिनियम, २००८ (२००९ चा ४) च्या कलम ३ तसेच सर्वसाधारण कलम अधिनियम, १८९७ (१८९७ चा १०) याचे कलम २१ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक ८ ऑक्टोबर २०२३ पासून, शासन अधिसूचना , विधि व न्याय विभाग, क्रमांकः सीआरसी-२०१३/प्र.क्र.१५/कार्यासन-१२, दि.२८ फेब्रुवारी २०१४ विखंडीत करीत आहे

.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

विलास व्ही.गायकवाड,
शासनाचे विधि सल्लागार-नि-सहसचिव.

LAW AND JUDICIARY DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 3rd October 2023.

NOTIFICATION

GRAM NAYALAYAS ACT, 2008.

No.NYAYASTHA-1022/C.R.124/DESK-11.—Whereas, the Government of Maharashtra, by Government Notification, Law and Judiciary Department No. CRC-2013/C.R.15/DESK-12, dated 28th February 2014 has, in exercise of the powers conferred by section 3 of the Gram Nyayalayas Act, 2008 (4 of 2009) in its application to the State of Maharashtra, and after consultation with the High Court of Judicature at Bombay, established the Gram Nyayalaya for the village at Mandangad, subordinate to the District Court of Ratnagiri, in Ratnagiri District with effect from the 8th October 2023;

And whereas, the Government of Maharashtra by Government Notification, Law and Judiciary Department, No. NYAYASTHA-1022/C.R.124/DESK-11 dated 3rd October 2023 has, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 11 of the Code of Criminal Procedure, 1973 (2 of 1974) and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf and of all other powers enabling in that behalf, and after consultation with the High Court of Judicature at Bombay, established a regular Court of Judicial Magistrate, First Class, Mandangad, with effect from 8th October 2023 ;

And whereas, as the regular Court of Judicial Magistrate, First Class, Mandangad is functioning for the respective jurisdiction, the Government of Maharashtra considers it expedient to direct that the Gram Nyayalaya for village Mandangad shall cease to function;

And whereas, the Government of Maharashtra, by Government Notification, Law and Judiciary Department, No. NYAYASTHA-1022/C.R.124/DESK-11 dated 3rd October, 2023 has, in exercise of the powers conferred by sections 21, 22A and 23 of the Maharashtra Civil Courts Act (XIV of 1869) and in partial modification of all the earlier notifications issued in this behalf and of all other powers enabling in that behalf, and after consultation with the High Court of Judicature at Bombay, established regular Court of Civil Judge Junior Division, Mandangad, with effect from 8th October 2023 ;

And whereas, as the regular Court of Civil Judge Junior Division and Judicial Magistrate, First Class, Mandangad is functioning for the respective jurisdiction, the Government of Maharashtra considers it expedient to direct that the Gram Nyayalaya for village Mandangad shall cease to function.

Now, therefore, in exercise of the powers conferred by Section 3 of the Gram Nyayalayas Act, 2008 (4 of 2009) read with section 21 of the General Clauses Act, 1897 (10 of 1897) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, with effect from 8th October 2023 rescinds the Government Notification, Law and Judiciary Department No. CRC-2013/C.R.15/DESK-12, dated 28th February 2014

. . By order and in the name of the Governor of Maharashtra,

VILAS V. GAIKWAD,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.